(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XI / Issue – I ISSN 2277-8063

# सोशल मिडिया,निवडणुका आणि भारतीय राजकारण

डॉ.सुजाता पाटील देवचंद कॉलेज,अर्जुननगर

---

**प्रस्तावना:**

सोशल मीडियामध्ये आधुनिकता आल्यापासून लोक परस्परांशी जोडले गेले आणि सोशल मिडीयाच्या माध्यमातून माहिती मिळविण्याच्या आणि प्रसारित करण्याच्या पद्धतीत बदल झालेला आढळतो. पूर्वीच्या वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, टी.व्ही. अशा पारंपरिक माध्यमांपेक्षा सध्याची सोशल मीडियाची माध्यमे वेगळी बनलेली आहेत. तंत्रज्ञानाच्या आधारे माहितीची देवाण-घेवाण तसेच कमी शब्दात व सांकेतिक चिन्ह यांच्या माध्यमातून लोक संवाद साधतात. आजच्या सोशल मीडिया जास्तीत जास्त वापर युवापिढी वापरत असताना आढळते. फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप च्या माध्यमातून सोशल मीडिया विस्तृत झालेली आढळते. राजकीय पक्ष सुद्धा तरुणपिढीवर आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या आधारे सोशल मीडिया याचा वापर करताना दिसून येते. चालू दशकात झालेल्या निवडणुकीत देशात बहुसंख्य युवा मतदार दिसून आले

**समाज माध्यमावर युवावर्गाचा अधिकतम सहभाग:**

सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय पक्ष मतदारांच्या मागण्या, त्यांच्या आशा, अपेक्षा, त्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न करतात व त्या पद्धतीने मतदारांच्या विचारांशी सुसंगत अशा प्रकारच्या टिप्पण्या सोशल मीडिया वरती टाकण्याचा प्रयत्न करतात. राजकीय पक्ष तसेच राजकीय नेतृत्व करणारे प्रचार करण्याच्या उद्देशाने तसेच मतदारांशी संपर्क साधून त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्यावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. राजकीय नेते हे राजकारणातील हालचाली या सर्व जनतेसमोर, मतदारांसमोर मांडण्यासाठी ब्लॉग, ट्विटर, इंस्टाग्राम, फेसबुक अशा माध्यमांचा वापर करतात. या आधारे जनतेचा कौल जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. सर्वसामान्य व्यक्तींचे राजकीय जागृती आणि राजकीय मते मांडण्याचे व्यासपीठ सोशल मीडियावर निर्माण झालेले आहे. आजचे तरुण मतदार राजकीय विषयांवरती सोशल मीडियाद्वारे चर्चा करताना दिसतात . पूर्वी शहरी भागात राजकीय चर्चा हि प्रामुख्याने मासिके, वर्तमानपत्रे किंवा वृत्तवाहिन्यांच्या माध्यमातून तर ग्रामीण भागात गटागटाने कोपऱ्यावरती किंवा गावातील मध्यवर्ती असणाऱ्या कट्यापुरती मर्यादित होती.

आधुनिक मीडियाच्या माध्यमातून आजचे तरुण सामाजिक चर्चा,अभ्यास राजकारणातील चर्चा करतात. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्या असलेल्या देशात आजची सोशल मीडिया जागरूकता निर्माण करण्याची महत्वपूर्ण भूमिका पार पाडण्याचे कार्य करते असे म्हणता येईल. 2010 नंतर झालेल्या निवडणुकांमध्ये सोशल मीडियाच्या माध्यमातून निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांनी आपला प्रचार आणि प्रसार केलेला आढळतो. अलीकडील झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांनी सोशल

मीडियाचा यशस्वी वापर निवडणूकीत केलेले आहेत. निवडणुकीच्या काळात सोशल मीडियाचा प्रामाणिकपणे आणि पारदर्शीपणे वापर होतोच असे नाही. सोशल मीडियाच्या माध्यमातून बनावट खाती तयार केली जाऊ शकतात. त्याआधारे चुकीची माहिती किंवा विविध पोस्ट टाकले जातात वेगळ्या स्वरूपात प्रतिमा पुढे आणल्या जातात व राजकीय पक्षाची तसेच उमेदवाराची सकारात्मकता वाढविण्यासाठी अशा पद्धतीने सोशल मीडियाचा वापर केला जाऊ शकतो. भारतात भविष्यात निवडणुकांमध्ये सोशल मीडिया वापरून मतदारांच्या मतांवरती, कल्पनांवरती प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होऊ शकतो त्यामुळे या सगळ्या बाबींकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते.

*निवडणूक आयोगाकडून सोशल मीडिया धोरण अस्तित्वात आलेले आहे. निवडणूक प्रचारात सोशल मीडियाच्या वापराबाबत सूचना केलेल्या दिसून येतात . निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सोशल मीडिया साइट्सना पूर्व प्रमाणीकरणाच्या कक्षेत आणले आहे व सोशल मीडियावरील जाहिरातींच्या खर्चाचा तपशीलही निवडणूक खर्चाच्या खात्यात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत.

* सोशल मीडियावरील ब्लॉग्स, वेबसाइट, पोस्ट, संदेश अशा स्वरूपातील राजकीय सामग्री ग्राह्य धरले जाणार नाही तसेच पूर्व प्रमाणे करण्यासाठी त्याची आवश्यकताही नाही. परंतु वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या जाहिरातींसाठी पूर्व प्रमाणीकरण आवश्यक आहे.

**सार्वत्रिक निवडणुकीसाठी सोशल मिडियाचा गैरवापर:**

राजकारण कधी स्थिर नसते त्यात सतत बदल होत राहते. त्याच पद्धतीने काळाच्या ओघात सोशल मीडिया मध्ये सुद्धा बदल घडून आले. निवडणूक काळात सोशल मीडियावरील राजकारणाचे महत्त्व वाढत असलेले दिसून येते. देशासमोर अनेक प्रश्न उभे असताना राजकारणी मात्र सत्तेच्या राजकारणात गुंतलेली असतात. नुकत्याच जगावर आलेल्या अस्मानी संकटात बऱ्याच राष्ट्रात एकमेकांवर कुरघोडी करणाऱ्या राजकारणाला ऊत आला होता. शेतीविषयक, सामाजिक, बेरोजगारी, दारिद्र्य निर्मूलन अशासारख्या प्रश्नांवरती राजकीय चर्चा होण्याऐवजी समोरील विरोधी किंवा सत्ताधारी गट कसा चुकीचा आहे हे दाखविण्यासाठी प्रचंड वेळ वाया घालविला जातो. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. स्त्री सुरक्षिततेचा महत्त्वाचा प्रश्न आहे. बालकांचा विकासाचा आणि आरोग्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक स्वच्छता आणि आरोग्य याचा प्रश्न उभा आहे. पण या सर्वांपेक्षा पाच वर्षात सत्ताधारी काहीच करू शकले नाहीत हे पटवून देण्यात पूर्ण पाच वर्ष घालविली जातात. आपण सत्तेत असताना अशा प्रश्नांना कशी बगल दिली याचा लवलेशही त्यांच्या बोलण्यात नसतो. जातीय तेढ आणि धर्मांधता वाढविण्याचे कार्य निवडणूक काळात मीडियाच्या माध्यमातून होताना आढळते. कोणताही पक्ष निवडणूक काळात झालेल्या पाच वर्षाचा आढावा घेऊन राष्ट्र विकासासाठी या गोष्टींची कमतरता आहे आणि त्याच्या संदर्भातील या योजना आम्ही कार्यान्वित करू असे सांगत नाही. सोशल मीडियावर नुसता आश्वासनांची खैरात केली जाते. ती सत्यात कधीच उतरत नाही. राजकारणात सोशल मिडीयाचा वापर बऱ्याच वेळा अयोग्य आणि असभ्य पणे होत असलेला दिसून येतो.

खोट्या बातम्यांच्या माध्यमातून जनतेच्या संवेदनशीलतेला आवाहन देण्याचे कार्य बऱ्याच वेळेला राजकीय पक्ष करतात. अपप्रचार करून मतदारांचा दिशाभूल करण्याचा प्रयत्नही केला जातो.

अशा प्रकारच्या सोशल मीडियातील विविध साधनांच्या बाबतीत निवडणूक काळात निरपेक्ष पणे निवडणूका पार पाडण्यासाठी सोशल मीडिया धोरण आणि आचार संहिता निर्माण करण्यात आली.

**निष्कर्ष:**

मीडियाच्या विविध साधनांच्याद्वारे खोट्या बातम्या, चुकीची माहिती देऊन दिशाभूल करण्याचा होणारा प्रयत्न हे रोखण्यासाठी निवडणूक आयोग आणि सोशल मीडिया हे दोन्ही घटक कार्य करीत आहेत. सोशल मीडियाचा हा बऱ्याच वेळेला निवडणुक काळात सोशल मीडिया माध्यमातून व्यक्ती, व्यक्ती गट हे आपले कार्यकर्ते किंवा अनुयायी वाढविण्यासाठी चुकीच्या माहितीचा आधार देतात. खोट्या बातम्या प्रसारित करतात. अशावेळी स्वत:ची नावे बदलतात विरोधी उमेदवारच्या प्रतिमा डागाळण्याचा साठी प्रयत्न करतात.

त्यामुळे समाजात राजकीय आणि सामाजिक विभाजनाचा गैरवापर करण्याचा प्रयत्न होऊ शकतो. सोशल मीडियाचा नियमन करणारा भक्कम कायदा अजूनही अस्तित्वात नाही. त्यामुळे सोशल मिडियाचा गैरवापर मोठ्या प्रमाणात होतो सोशल मीडियाचा वापर करणारे वाढले आहेत .पंधरा सोळा वयोगटात पासून वृद्धांपर्यंत सर्वजण सोशल मीडिया वरती राजकीय हालचाली पहात असतात. त्याविषयीच्या चर्चेत अप्रत्यक्षपणे सहभागी होत असतात. त्यामुळे अंतर्गत हेवेदावे, वाद, संघर्ष विकोपाला जाताना दिसतात. जगातील सगळ्यात मोठी लोकशाही व्यवस्था असणारा आपला देश आहे .त्यामुळे सोशल मीडियाच्या माध्यमातून राजकीय दृष्ट्या होणारा गैरवापर वेळीच रोखला पाहिजे. अन्यथा आपल्या लोक देशातील लोकशाही प्रक्रियेला मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे सोशल मिडियाचा वापर करण्याबाबत राजकीय पक्षांकडून कठोर कायदे तयार करण्याची त्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची शिफारस होत असताना आढळते. राजकीय दृष्ट्या सज्ञान असलेल्या सर्व नागरिकांनी सोशल मीडियाच्या वापराबाबत काळजी घेतली पाहिजे त्यातील सत्यता व योग्यता पडताळून पाहिली पाहिजे व योग्य पद्धतीने सोशल मीडिया ची साधने हाताळली पाहिजेत.

संदर्भ:

1)**Role of Social Media in Indian Politics by Jinali Sanghavi, Ldesire 07 August , 2020**

**2) www.eci.gov.in**

**3) http://dxdoi.org/10.24327/ijrsk.2018.0901.1472**